# वित्त विभाग, जिल्हा परिषद पालघर

**मुख्य प्रशासकीय इमारत, नवीन विक्रीकर कार्यालय, बिडको रस्ता, नवली, ता.जि.पालघर**

**दुरध्वनी क्र. ०२५२५-२९७००३** **e-mail : cafozp.palghar@gmail.com**

**प्रेषण प्रमाणपत्र घेऊन**

जा.क्र.पाजिप/अर्थ/वित्त समिती/वशी/ ७९/१६.
वित्त विभाग, जि.प. पालघर
दिनांक :१६/१२/२०१६.

**नोटीस**

या पत्रान्वये पालघर जिल्हा परिषद अर्थ समितीचे सन्माननीय सदस्य मा.श्री./श्रीम.________________________________ मुक्काम__________ पोस्ट__________ तालुका__________ जिल्हा पालघर यांस कळविण्यांत येते की अर्थ समितीची सभा **बुधवार दिनांक २८.१२.२०१६ रोजी स.११.३०** वाजता **मा.सभापती, अर्थ समिती तथा उपाध्यक्ष, जि.प.पालघर यांचे दालनात** आयोजित करण्यात आली आहे. सदर सभेस हजर राहणेस विनंती आहे.

**टिप** :- गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा त्याच ठिकाणी अर्ध्यातासाने सभा घेतली जाईल.

**मा.सभापती अर्थ समिती यांचे मान्यतेनुसार.**

**सही/-**
**मा. सभापती अर्थ समिती,**
**जिल्हा परिषद पालघर**

**विषय पत्रिका :**

विषय क्र. १.(अ) - मागील अर्थ समिती सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत.
(ब) - मागील अर्थ समिती सभेत मंजूर ठरावांच्या अंमलबजावणीबाबत.

विषय क्र. २. जिल्हा परिषद पालघरच्या माहे ऑक्टोंबर २०१६ च्या मासिक जमा/खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून स्थायी समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.

विषय क्र.३. मा.सभापती यांचे परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय.

**सचिव अर्थ समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**प्रत माहितीसाठी सादर.**

१.मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद पालघर.
२.मा.उपाध्यक्ष, जिल्हा परिषद पालघर.
३.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर.
४.मा.अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर.
५.खाते प्रमुख(सर्व) ________________ जिल्हा परिषद पालघर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

# अर्थ समिती सभा दिनांक ०२.१२.२०१६
## इतिवृत्त भाग -१

| अ.क्रं. | सभेस उपस्थित पदाधिकारी | सभेस उपस्थित अधिकारी व कर्मचारी |
|---|---|---|
| १) | **मा.श्री.सचिन गजानन पाटील,** | १) श्री. एस.पी.पतंगे, सचिव तथा |
| | **सभापती, अर्थ समिती, जि.प.पालघर** | मु.ले.व वि.अ., जि.प.पालघर |
| २) | मा. श्रीम.दर्शना शांताराम दुमाडे, सदस्य | २) श्री. पी.के.कोरडे, स.ले.अ, वित्त विभाग |
| ३) | मा. श्रीम.गिता अजय धामोडे, सदस्य | ३) श्री. मनिष राजभोज, काअ.ल.पाटबंधारे |
| ४) | मा. श्रीम.चित्रा ह्रदयनाथ किणी, सदस्य | ४) श्री. ए.एम. संखे, क.स. ग्रा पापु. |
| ५) | मा. श्री. चेतन दिलीप धोडी, सदस्य | ५) श्री. भूषण तरे, स.प्राशा. अधिकारी |
| ६) | मा. श्रीम.पार्वती चंद्रकांत भुसारा, सदस्य | [illegible] |
| ७) | मा. श्रीम.रंजना किशोर संखे, सदस्य | ६) श्री. सतिश साबळे, क.ले.अ, वित्त विभाग |
| ८) | मा. श्रीम.कल्याणी किशोर तरे, सदस्य | ७) श्री. आर.डी. पाटील, स्विय सहा.मा.उपाध्याक्ष |
| ९) | मा. श्री.किशोर बारकू बरड, सदस्य | |

माहे डिसेंबर २०१६ ची अर्थ समिती सभा शुक्रवार, दिनांक ०२.१२.२०१६ रोजी, स.११.३० वाजता मा.सभापती, अर्थ समिती तथा उपाध्यक्ष, जि.प.पालघर यांचे दालनात आयोजती करणेत आली होती. त्यानुसार दिनांक ०२.१२.२०१६ रोजी, स.११.३० वाजता सभा सुरू करण्यात आली. प्रथम मा.श्री.सचिन गजानन पाटील सभापती अर्थ समिती, जि.प.पालघर यांनी उपस्थित सर्व सन्माननीय अर्थ समिती सदस्यांचे स्वागत करून समिती सचिव तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.पालघर यांना सभेचे कामकाज सुरु करणेस सांगितले.

त्यानुसार सभेचे सचिव श्री.एस.पी.पतंगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प.पालघर यांनी मा.सभापती यांच्या परवानगीने सभेचे विषय निहाय कामकाज सुरु केले.

**<u>विषय क्रं. १.</u>**

**(अ) मागिल अर्थ समिती सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणेबाबत.**

अर्थ समिती सभा दिनांक ०४.११.२०१६ च्या सभेचे इतिवृत्त सर्व सन्माननिय सभासदांना देण्यात आलेले आहे, सदरच्या इतिवृत्तात काही नोंदी घ्यावयाच्या राहिल्या असतील तर तसे सुचित करावे असे माननीय सभापती महोदयांनी सभागृहात सांगितले. याप्रमाणे दिनांक ०४.११.२०१६ च्या इतिवृतामध्ये सन्मा.सदस्यांच्या सुचना नसल्याने इतिवृतास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**(ब) मागील अर्थ समिती सभेत मंजूर ठरावांच्या अमंलबजावणी बाबत.**

दिनांक ०४.११.२०१६ च्या अर्थ समिती सभेमध्ये मंजूर झालेल्या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर माहीती अर्थ समितीचे सचिव यांनी सभागृहात दिली व त्यास मा. सदस्यांनी सहमती दर्शविली.

**विषय क्रं. २.**

**जिल्हा परिषद पालघरचा माहे सप्टेंबर २०१६ च्या मासिक जमा व खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून अर्थ समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.**

पालघर जिल्हा परिषदेचे माहे सप्टेंबर २०१६ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चाचे तक्ते सन्माननीय सदस्यांना देण्यात आलेले आहेत. अर्थ समितीचे सचिव श्री.एस.पी.पतंगे यांनी सदर जमा खर्च तक्यांमधील योजनांबाबत लेखाशिर्ष निहाय सविस्तर जमा व खर्चाची माहिती सभागृहास दिली.

सन्माननीय सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा करून माहे सप्टेंबर २०१६ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चास सभागृहाने सर्वानुमते मान्यता दिली व मंजुरीसाठी स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस करण्यात आली.

**विषय क्र. ३.**

**वित्त विभाग, जिल्हा परिषद पालघर कडील माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ व एप्रिल २०१६ ते सप्टेंबर २०१६ अखेरच्या लेखाविषयक नोंदवहयांना मंजूरी मिळणेबाबत.**

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक १५.०३.१९८४ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील तरतुदींनुसार वित्त विभागातील लेखाविषयक नोंदवहया पूर्ण व बिनचूक ठेवल्या असलेबाबतचा त्रैमासिक अहवाल वित्त समिती सभेपुढे ठेवणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

या अनुषंगाने वित्त विभाग, जि.प.पालघर येथे सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ व सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता एप्रिल २०१६ ते सप्टेंबर २०१६ अखेर पूर्ण व बिनचूक ठेवण्यात आलेल्या खालील तक्त्यात नमुद लेखाविषयक नोंदवहया समितीच्या अवलोकनार्थ सादर करणेत आल्या.

| अ. क्र. | लेखाविषयक नोंदवहीचा तपशिल | अ. क्र. | लेखाविषयक नोंदवहीचा तपशिल |
|---|---|---|---|
| १. | रोख रोजकिर्द नमुना नं.४ | ८. | वित्त विभाग मासिक जमा व खर्चाचा वर्गीकृत गोषवारा नोंदवही नमुना नं.१९ |
| २. | रोजकिर्द नमुना नं.७ | ९. | अनामत नोंदवही नमुना नं.७१ |
| ३. | धनादेश नोंदवही नमुना नं.११ | १०. | अग्रिम नोंदवही नमुना नं.७९ |
| ४. | देयक नोंदवही नमुना नं.१२ | ११. | अनुदान नोंदवही नमुना नं.९० |
| ५. | जमा नोंदवही नमुना नं.१३ | १२. | साठा नोंदवही नमुना नं.३३ |
| ६. | खर्च नोंदवही नमुना नं.१४ | १३. | पावती पुस्तक नोंदवही नमुना नं.१० |
| ७. | खाते बदल नोंदवही नमुना नं.१७ | १४. | गुंतवणूक नोंदवही नमुना नं.८४ |

सदर लेखाविषयक नोंदवहयांचे अवलोकन करून सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ व सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता एप्रिल २०१६ ते सप्टेंबर २०१६ अखेर पूर्ण लेखाविषयक नोंदवहयांना अर्थ समितीने मंजूरी दिली.

**विषय क्र. ४.**

**मा. सभापती यांचे परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय.**

**विषय क्र. १.**

**पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्ती निधी सन २०१६-१७ चे पुरवणी अंदाजपत्रकास व निधीच्या पुनर्वीनियोजनास अर्थ समितीची शिफारस घेऊन आगामी जिल्हा परिषद सर्वससाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करणे.**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (अर्थसंकल्पीय अंदाज) नियम १९६६ मधील नियम क्र.१३८ (२) नुसार पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती निधी सन २०१६-१७ अंतर्गत खालील तक्त्यास नमुद केल्यानुसार खर्चाचे पुनर्वीनियोजनाचा प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

| अ. क्र. | खर्चाचे लेखाशिर्ष | सन २०१६-१७ ची मुळ तरतूद | पुनर्वीनियोजन कमी (-) | पुनर्वीनियोजन अधिक (+) | सन २०१६-१७ ची सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १) | वेतन व भत्ते | ५०,००,००० | ११,००,००० | -- | ३९,००,००० |
| २) | प्रवास | ५,००,००० | -- | १०,००,००० | १५,००,००० |
| ३) | विद्युतपंप दुरूस्ती | ५,००,००० | -- | -- | ५,००,००० |
| ४) | जी.आय. पाईप्स | २०,००,००० | -- | -- | २०,००,००० |
| ५) | हातपंप खरेदी सुट्टे भाग | १०,००,००० | -- | -- | १०,००,००० |
| ६) | हातपंप वाहन दुरुस्ती (इंधनासह) | ५,००,००० | -- | ५,००,००० | १०,००,००० |
| ७) | उपविभागास भाडयाने वाहन पुरविणे | १०,००,००० | ८,००,००० | -- | २,००,००० |
| ८) | ॲलम/ टि.सी.एल. | २०,००,००० | -- | -- | २०,००,००० |
| ९) | ग्रामीण न. पा. पु. यो. दुरुस्ती | ६०,००,००० | -- | -- | ६०,००,००० |
| १०) | सादिल (स्टेशनरी, रेकॉर्ड) | ७,००,००० | -- | ३,००,००० | १०,००,००० |
| ११) | एम.आय.डी. सी./ बी. एम. सी. म.जि.प्रा.इ. पाणी पट्टी बिल | ६०,००,००० | -- | ४५,००,००० | १०५,००,००० |
| १२) | प्रा. न. पा. पु. योजनेची विद्युत देयके प्रा. न. पा. यो. देखभाल व दुरुस्ती | १,५०,००,००० | ५०,००,००० | -- | १,००,००,००० |
| १३) | कायमस्वरुपी अडकलेले विद्युतपंप व हातपंप बाहेर काढणे व विंधन विहिर साफ करणे | ७,००,००० | -- | -- | ७,००,००० |
| १४) | सौर उर्जा पंप खरेदी करणे सौर उर्जेवर नळ पाणी पुरवठा योजना करणे, बंद न. पा. पु. यो. चे सौर उर्जेमध्ये रुपांतर करणे. | ४०,००,००० | -- | -- | ४०,००,००० |
| १५) | PESA अंतर्गत Unidentified Habitation ला विंधन विहिर करणे | २०,००,००० | -- | -- | २०,००,००० |
| १६) | विहिर दुरुस्ती | ५०,००,००० | १५,००,००० | -- | ३५,००,००० |
| १७) | संगणक खरेदी व दुरुस्ती | ३,००,००० | -- | -- | ३,००,००० |
| १८) | इतर गोडावुन दुरुस्ती | २,००,००० | -- | -- | २,००,००० |
| १९) | प्रोत्साहन अनुदान | ५०,००,००० | -- | -- | ५०,००,००० |
| २०) | हातपंप मदतनीस मानधन | ५,००,००० | -- | २०,००,००० | २५,००,००० |
| २१) | नाविण्यापूर्ण उपक्रम | ५,००,००० | -- | -- | ५,००,००० |
| २२) | कारेगांव पाणी पुरवठा योजना | ७१,१४,७४२ | -- | -- | ७१,१४,७४२ |
| २३) | पर्यटन स्थळांना नळ पाणी पाणी पुरवठा योजना करणे | ५,००,००० | -- | १,००,००० | ६,००,००० |
| २४) | पुर्नविनोयोजना जलपुर्नभरण | ६०,००,००० | -- | -- | ६०,००,००० |
| २५) | शिल्लक | १,७७,६५९ | -- | -- | १,७७,६५९ |

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (अर्थसंकल्पीय अंदाज) नियम १९६६ मधील नियम क्र.१३८ (२) नुसार ही अर्थ समिती सभा सदर पुर्वविनियोजनास मंजुरी देऊन आगामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी शिफारस केली.

सभेपुढे चर्चेकरीता अन्य विषय नसल्याने सचिव श्री. संजय पतंगे, तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी मा.सभापती यांचे परवानगीने सभेस उपस्थित अर्थ समिती सदस्य, विभाग प्रमुख व त्यांचे प्रती निधी यांचे आभार मानून सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

**सचिव अर्थ समिती तथा**
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**मा. सभापती,**
**अर्थ समिती तथा उपाध्यक्ष**
**जिल्हा परिषद पालघर**

# अर्थ समिती सभा दिनांक ०२.१२.२०१६
## इतिवृत्त भाग -२

| सभेची तारीख व वेळ | ठरावाचा विषय | प्रस्तावाची रचना | प्रस्ताव सूचक व अनुमोदक | प्रस्ताव कोणताही असल्यास | | दुरूस्ती मतदाना नंतरचा ठराव | ठराव क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बाजूने | विरुध्द | | |
| शुक्रवार, दिनांक ०४.११.२०१६ रोजी, स. ११.३० वा | **विषय क्र.१ (अ) मागिल सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.** | अर्थ समिती सभा दिनांक ०४.११.२०१६ च्या सभेचे इतिवृत्त सर्व सन्माननिय सभासदांना देण्यात आलेले आहे, सदरच्या इतिवृत्तात काही नोंदी घ्यावयाच्या राहिल्या असतील तर तसे सुचित करावे असे माननीय सभापती महोदयांनी सुचविले. दिनांक ०४.११.२०१६ च्या इतिवृत्तामध्ये दुरूस्ती सन्मा.सदस्यांच्या सुचना नसल्यामुळे इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | मा.श्रीम.दर्शना शांताराम दुमाडे, सदस्या.<br>मा.श्रीम.गिता अजय धामोडे, सदस्या. | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ४६ |
| | **विषय क्र.१ (ब) मागील ठरावाच्या अमंलबजावणी बाबत.** | दिनांक ०४.११.२०१६ च्या अर्थ समिती सभेमध्ये मंजूर झालेल्या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर माहीती अर्थ समितीचे सचिव यांनी सभागृहात दिली व त्यास मा.सदस्यांनी सहमती दर्शविली. | मा.श्रीम. चित्रा हृदयनाथ किणी, सदस्या.<br>मा.श्रीम.कल्याणी किशोर तरे, सदस्या. | -- | -- | -- | -- |
| | **विषय क्रं .२ .**<br>**जिल्हा परिषद पालघरचा माहे सप्टेंबर २०१६ च्या मासिक जमा व खर्चाच्या तक्त्यास मंजूरी देवून अर्थ समितीच्या मंजूरीसाठी शिफारस करणेबाबत.** | पालघर जिल्हा परिषदेचे माहे सप्टेंबर २०१६ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चाचे तक्ते सन्माननीय सदस्यांना देण्यात आलेले आहेत.<br>सन्माननीय सदस्यांनी यावर सविस्तर चर्चा करून माहे सप्टेंबर २०१६ च्या हस्तांतरित, अभिकरण व जिल्हा परिषद योजनांच्या जमा व खर्चास सभागृहाने सर्वानुमते मान्यता दिली व मंजुरीसाठी स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस करण्यात आली. | मा.श्रीम.चित्रा हृदयनाथ किणी, सदस्या.<br>मा.श्रीम.दर्शना शांताराम दुमाडे, सदस्या. | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ४७ |

| सभेची तारीख व वेळ | ठरावाचा विषय | प्रस्तावाची रचना | प्रस्ताव सूचक व अनुमोदक | प्रस्ताव कोणताही असल्यास | | दुरूस्ती मतदाना नंतरचा ठराव | ठराव क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बाजूने | विरुध्द | | |
| | **विषय क्र.३ .**<br>**वित्त विभाग जिल्हा परिषद , पालघर कडील माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ व एप्रिल २०१६ ते सप्टेंबर २०१६ अखेरच्या लेखाविषयक नोंदवहयांना मंजूरी मिळणेबाबत.** | ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक १५.०३.१९८४ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ मधील तरतुदींनुसार वित्त विभागातील लेखाविषयक नोंदवहया पूर्ण व बिनचूक ठेवल्या असलेबाबतचा त्रैमासिक अहवाल वित्त समिती सभेपुढे ठेवणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.<br>या अनुषंगाने वित्त विभाग, जि.प.पालघर येथे सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ व सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता एप्रिल २०१६ ते सप्टेंबर २०१६ अखेर पूर्ण व बिनचूक ठेवण्यात आलेल्या लेखाविषयक नोंदवहया समितीच्या अवलोकनार्थ सादर करणेत आल्या.<br>सदर लेखाविषयक नोंदवहयांचे अवलोकन करून सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता माहे जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ व सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता एप्रिल २०१६ ते सप्टेंबर २०१६ अखेर पूर्ण लेखाविषयक नोंदवहयांना अर्थ समितीने मंजूरी दिली. | मा.श्रीम.कल्याणी किशोर तरे, सदस्या.<br>मा.श्रीम.चित्रा हृदयनाथ किणी, सदस्या. | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ४८ |

| सभेची तारीख व वेळ | ठरावाचा विषय | प्रस्तावाची रचना | प्रस्ताव सूचक व अनुमोदक | प्रस्ताव कोणताही असल्यास | | दुरूस्ती मतदाना नंतरचा ठराव | ठराव क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बाजूने | विरुध्द | | |
| | **<u>विषय क्र. ४.</u>**<br>**मा. सभापती यांचे परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय.**<br><br>**<u>विषय क्र. १.</u>**<br>**पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्ती निधी सन २०१६-१७ चे पुरवणी अंदाजपत्रकास व निधीच्या पुनर्वीनियोजनास अर्थ समितीची शिफारस घेऊन आगामी जिल्हा परिषद सर्वससाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करणे.** | महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (अर्थसंकल्पीय अंदाज) नियम १९६६ मधील नियम क्र.१३८ (२) नुसार पाणीपुरवठा देखभाल दुरुस्ती निधी सन २०१६-१७ अंतर्गत खालील तक्त्यास नमुद केल्यानुसार खर्चाचे पुनर्वीनियोजनाचा प्रस्ताव सादर करणेत येत आहे.<br>महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (अर्थसंकल्पीय अंदाज) नियम १९६६ मधील नियम क्र.१३८ (२) नुसार ही अर्थ समिती सभा सदर पुर्नविनियोजनास मंजुरी देऊन आगामी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी शिफारस केली. | मा.श्रीम.पार्वती चंद्रकांत भुसारा, सदस्या.<br><br>मा.श्रीम.गिता अजय धामोडे, सदस्या. | ठराव सर्वानुमते मंजूर | -- | -- | ४९ |

**सचिव अर्थ समिती**
**तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद पालघर**

**मा.सभापती**
**अर्थ समिती तथा उपाध्यक्ष,**
**जिल्हा परिषद पालघर**